**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या नवनगराची हद्द सुधारित करणेबाबत...**
पुरकपत्र निर्गमित करणेबाबत..

**<u>महाराष्ट्र शासन</u>**
**नगर विकास विभाग**
**मुख्य इमारत, ४ था मजला, मंत्रालय,मुंबई-३२.**
**शासन निर्णय क्रंमाक- टिपीएस-१२१८/१३७२/प्र.क्र.१७९/१८/नवि-१२,**
**दिनांक :- ६ फेब्रुवारी, २०१९.**

**शासन निर्णय** :- सोबतचे पुरकपत्र (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या कोकण विभाग साधारण राजपत्रात प्रसिध्द करावे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2019.02.07 15:02:26 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**
**कार्यासन अधिकारी**

**प्रति,**

१) व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) जिल्हाधिकारी, ठाणे.
५) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सहाय्यक संचालक नगर रचना, ठाणे शाखा, जि. ठाणे यांनी पुरकपत्रासोबतचे नकाशे आपले कार्यालयास सादर केल्यानंतर सदर नकाशांची कृपया छाननी करुन सदर नकाशे शासनाच्या पुरकपत्रकानुसारच असल्याची खात्री आपल्या स्तरावर करुन त्यानंतर सदर नकाशे अधिप्रमाणित करण्यासाठी शासनास पाठवावेत.)
६) उपसचिव (नगर रचना) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
७) सहायक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.
(त्यांना विनंती करण्यात येते की, पुरकपत्रासोबत प्रसिध्द करावयाचे नकाशे ७ प्रतीत अधिप्रमाणित करण्याकरिता विहीत मार्गाने शासनास तात्काळ पाठवावेत.)
८) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करावे व त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई, सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा यांना पाठवाव्यात.)
९) कक्ष अधिकारी,कार्यासन (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे पूरकपत्र विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.)
१०) निवडनस्ती (कार्यासन नवि-१२)

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**
**4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai-400 032.**
**Dated: 6th February, 2019.**

**CORRIGENDUM**

**Read :-** Government Notification No. TPS-2617/C.R.53/2017(A)/ UD-30, Dated 5th June, 2017.

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966,**
**No. TPS-1218/1372/C.R.179/18/UD-12**

Whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department, has in exercise of the powers conferred by Sub-section (1) and (3A) of Section 113 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide its Notification No.TPS-2617/C.R.53/2017(A)/UD-30, dated 5/6/2017 (hereinafter referred to as " the said Notificaion ") has declared and notified the area of four villages namely Kasgaon, Sapgaon, Shelvali and Khutghar, Taluka Shahapur, District Thane as " New Towns " (Agro prosperity Centres) (hereinafter referred to as ' the said Notified Area') and appointed the Maharashtra State Road Development Corporation (hereinafter referred to as " the said Corporation ") as the New Town Development Authority for the said notified area ;

And whereas, the said Corporation vide letter dated 8/2/2018 has requested Government to delete the lands bearing S. No./Gut No. 168/2 (Pt), 171/1 and others of village Sapgaon, Taluka Shahapur, District Thane having an area approx. 8.411 Ha. Are., from the said New Town and for these the said Corporation has given reasons that, as per the building permission/ NA permission the construction for the Educational purpose has been completed on the said land and the Engineering College is in the operation since year 2008, also the compensation will have to be given for the building alongwith the land;

And whereas, after considering the request of the said Corporation and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune Government is of the opinion that it is necessary to modify the boundaries of the said New Town area by issuing the corrigendum to the said Notification;

Now, therefore, Government hereby modifies the boundaries of the said New Town Area by issuing the following Corrigendum to the said notification;

**CORRIGENDUM :-**

The boundaries of the said New Town area are being modified by deleting the land situated at S. No./Gut No. 168/2 (Pt), 171/1 etc. of village Sapgaon, Taluka Shahapur, District Thane, as shown on the part plan of the Thane-Palghar-Raigad Regional Plan;

**By order and in the name of the Governor of Maharashtra.**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2019.02.07 15:04:34 +05'30'

**(Ashok K. Khandekar)**
**Section Officer**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक :- ६ फेब्रुवारी, २०१९.**

**<u>शुध्दीपत्रक</u>**

**वाचा** :- शासन अधिसुचना क्रमांक टिपीएस-२६१७/प्र.क्र.५३/२०१७(अ)/नवि-३०, दि. ५/६/२०१७.

**क्रमांक टिपीएस-१२१८/१३७२/प्र.क्र.१७९/१८/नवि-१२**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, शासन, नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ११३ चे पोटकलम (१) व पोटकलम (३अे) मधील तरतुदीनुसार जिल्हा ठाणे, ता. शहापूर येथील मौ. कासगांव, मौ. सापगांव, मौ. शेलवली व मौ. खुटघर या चार गावामधील क्षेत्र अधिसुचना क्र.टिपीएस-२६१७/प्र.क्र.५३/२०१७(अ)/नवि-३०, दि.५/६/२०१७ (यापुढे ज्याचा उल्लेख ‘उक्त अधिसूचना’ असा करण्यात आला आहे) अन्वये नवनगर (कृषी समृध्दी केंद्र) म्हणुन घोषित करुन अधिसुचित केले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख ‘उक्त अधिसुचित क्षेत्र’ असा करण्यात आला आहे) व उक्त अधिसुचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची (यापुढे ज्याचा उल्लेख “उक्त महामंडळ” असा करण्यात आला आहे.) नवनगर विकास प्राधिकरण म्हणुन नेमणुक केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महामंडळाने मौ. सापगाव, ता. शहापूर येथील स.नं./ग. नं.१६८/२पै., १७१/१ व इतर एकुण क्षेत्र ८.४११ हे. आर. जमीन उक्त नवनगर क्षेत्रामधून वगळण्याची विनंती शासनास दि.८/२/२०१८ च्या पत्रान्वये केली आहे व याकरिता उक्त महामंडळाने सदर भूखंडावर बिनशेती आदेशानुसार/बांधकाम परवानगीनूसार शैक्षणिक प्रयोजनार्थ इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असल्याचे व अभियांत्रिकी महाविद्यालय सन २००८ पासुन सुरु असल्याचे तसेच इमारतीसह जमिनीचा मोबदला दयावा लागणार असल्याची कारणमिमांसा उक्त महामंडळाने दिली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त महामंडळाची विनंती विचारात घेतल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त अधिसुचित क्षेत्राच्या हद्दी उक्त अधिसुचनेस खालीलप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करुन सुधारित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, शासन उक्त अधिसुचनेस खालीलप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करुन उक्त अधिसुचित क्षेत्राची हद्द सुधारित करीत आहे;

**<u>शुध्दीपत्रक</u>** : -

उक्त अधिसुचित क्षेत्रामधील मौ. सापगांव, ता. शहापूर येथील स. नं.१६८/२पै., १७१/१ व इतर, यासोबतच्या ठाणे-पालघर-रायगड प्रादेशिक योजनेच्या भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणेच्या जमिनी वगळून उक्त नवनगराची हद्द सुधारित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Ashok Kashirao Khandekar

Digitally signed by Ashok Kashirao Khandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0b35a0c4376224197af94647ad5d3746f35b5e2e6390afc4df35bfbb6227e873, serialNumber=f69156eb95826e5c31059dc88011664594ccaec5850de17bf3f059ea7f209a75, cn=Ashok Kashirao Khandekar
Date: 2019.02.07 15:05:24 +05'30'

**(अशोक का. खांडेकर)**
**कार्यासन अधिकारी.**